ePaper

**एक-दोन नव्हे, आठ नेत्यांनी शिवसेना सोडली, शिवबंधन हाती!**



॥ वर्ष - 8 । अंक -120 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- मुलाच्या जन्मासाठी थांबायचे असेल
- अपील करायला लाज वाटली पाहिजे
- काश्मीर विधानसभेत आमदार भिडले!
- लॉरेन्स बिश्नोईच्या फोटोंचे टी-शर्ट


www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 8 नोव्हेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आज महायुतीची जंगी सभा होणार

# नाशिकमध्ये मोदींची तोफ धडाडणार!

## सभेच्या माध्यमातून भाजप, तसेच महायुतीतर्फे जोरदार शक्तिप्रदर्शन

। नाशिक । महाईन्यूज

**राज्याच्या विधानसभा निवडणुकीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी मैदानात उतरले असून, महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ मोदींच्या उपस्थितीत शुक्रवारी (दि. ८) नाशिकमध्ये जाहीर सभा होत आहे. या सभेच्या माध्यमातून भाजप, तसेच महायुतीतर्फे जोरदार शक्तिप्रदर्शन करण्यात येणार आहे.**



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्यासह महायुतीचे बडे नेते या सभेला उपस्थित राहणार आहेत. गेल्या दोन विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मोदींनी भाजप उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा घेतल्यानंतर उमेदवार निवडून आले आहेत. त्यामुळे नाशिकमध्ये होत असलेल्या सभेची भाजपने जय्यत तयारी केली आहे. महायुतीने जिल्ह्यातील १५ मतदारसंघांपैकी १४ ठिकाणी उमेदवार दिले आहेत. आता महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचाराचा श्रीगणेशा करण्यासाठी थेट पंतप्रधान मोदीच नाशिकमध्ये येत आहेत. धुळे येथील सभा सकाळच्या सत्रात आटोपल्यानंतर दुपारी १२ वाजता पंचवटीतील तपोवनातील मैदानावर या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ओझर येथे वायुसेनेच्या विशेष विमानाने मोदींचे आगमन होईल. त्यानंतर ते हेलिकॉप्टरने धुळ्यातील सभास्थळाकडे रवाना होतील. धुळ्यातील सभा आटोपल्यानंतर मोदींचे हेलिकॉप्टर नाशिकला छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील नीलगिरीबागेतील हेलिपॅड येथे उतरेल. तेथून मोटारीने ते तपोवनातील सभास्थळाकडे जातील. या सभेला भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते तथा मंत्री छगन भुजबळ, शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या नीलम गोऱ्हे, अमर साबळे, मंत्री गिरीश महाजन आदींसह जिल्ह्यातील महायुतीचे सर्व १४ उमेदवार व्यासपीठावर उपस्थित राहणार आहेत. तब्बल एक लाखाहून अधिक लोक या सभेला उपस्थित राहतील, असा दावा भाजपकडून करण्यात आला आहे.

### मंत्री महाजनांकडून पाहणी

पंतप्रधानांच्या सभेची तारीख ठरल्यानंतर ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांनी सभेची जबाबदारी खांद्यावर घेत तातडीने नाशिकमध्ये तपोवनातील सभास्थळाची पाहणी केली होती. सभेच्या नियोजनाबाबत विविध सूचनाही केल्या होत्या. त्यानंतर मंत्री महाजन यांनी गुरुवारी पुन्हा नाशिकमध्ये येत सभेच्या तयारीचा आढावा घेतला. भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांना सूचना दिल्या. सभेची तयारी पूर्ण झाल्याची माहिती शहराध्यक्ष प्रशांत जाधव, लक्ष्मण सावजी यांनी दिली.

### सभास्थळी येणाऱ्यांवर नजर

लोकसभा निवडणुकीवेळी पिंपळगाव येथे झालेल्या सभेत कांदा प्रश्नावरून मोदींच्या सभेत व्यत्यय आला होता. कांद्यावर बोला असे आवाहन एका शेतकऱ्याने केल्यानंतर सभेत गोंधळ निर्माण झाला होता. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत असा प्रकार होऊ नये याकरिता सभेसाठी कडेकोट नाकाबंदी करण्यात आली आहे. मोदी यांच्या सभेसाठी पोलिसांनी ताकही फुंकून पिण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून, सभास्थळी येणाऱ्यांवर बारीक नजर ठेवली जाणार आहे.

## महायुतीचे शंकर जगताप यांची प्रचारात मुसंडी..!

## मिशन विधानसभा : पिंपळे सौदागरमध्ये प्रचाराला प्रतिसाद

। पिंपरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



चिंचवड विधानसभा मतदार मतदारसंघातील भाजप- शिवसेना- राष्ट्रवादी- आरपीआय व मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार शंकर जगताप यांचा बुधवारी पिंपळे सौदागर भागात गावभेट दौरा झाला. यावेळी आयोजित गावभेट दौऱ्या दरम्यान पदयात्रांना नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने त्यात सामीलही झाले.

माजी नगरसेवक नाना काटे, शत्रुघ्न (बापू) काटे, केशव घोळवे,निर्मला कुटे, शंकर काटे, प्रकाश झिंजुर्डे, भानदास काटे, उन्नती फाउंडेशनचे संजय भिसे, जगन्नाथ काटे, जयनाथ काटे, अनिल काटे, कैलास कुंजीर, शेखर कुटे आदी उपस्थित होते.

सकाळच्या सत्रात हिंद कॉलनी, यशवंत नगर, श्री स्वामी समर्थ कॉलनी, बापूसाहेब शिंदे कॉलनी, विश्वशांती कॉलनी, काटे वस्ती, भिसे पार्क या भागातुन गाव भेट दौरा करत पदयात्रा काढण्यात आली. “भारतीय जनता पार्टीचा विजय असो” “शंकर भाऊ जगताप तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है” अशा घोषणांनी पिंपळे सौदागर परिसर अक्षरशः दणाणून गेला होता. गाव भेटी दरम्यान घरोघरी महिलावर्गाकडून त्यांचे औक्षण करण्यात आले.

### प्रलंबित विकासकामे मार्गी लावणार...

चिंचवड विधानसभा मतदारसंघ भाजपचा बालेकिल्ला समजला जातो. गेल्या अनेक वर्षांपासून भाजपात निष्ठेने कार्यरत असलेले आणि चिंचवड विधानसभा मतदार संघात विविध विकासकामांमुळे चर्चेत आलेले स्व. लक्ष्मणभाऊ जगताप यांनी पिंपळे सौदागर भागात विकासाची गंगा आणली. त्यामुळे हा परिसर पिंपरी चिंचवड शहरातील स्मार्ट सिटी म्हणून ओळखला जावू लागला. दरम्यान, सर्व नागरिकांशी मनमोकळा संवाद साधताना शंकर जगतापांनी निवडून आल्यानंतर लगेचच या भागातली प्रलंबित विकास कामे पूर्ण करून देणार असल्याचे आश्वासन दिले. यापुढे नागरिकांना कोणत्याही समस्यांना सामोरे जावे लागणार नाही, असे ते म्हणाले. यावेळी नागरिकांनीही आपले पूर्ण समर्थन शंकर जगताप यांनाच असून त्यांनाच मत देणार असल्याचे जाहीर केले.

## आमदार सुनील शेळके यांचा पलटवार

# मावळात भाजपा संपवण्याचं कारस्थान!

## मिशन विधानसभा: संजय भेगडे, गणेश भेगडे यांचा नाकर्तेपणा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मावळातून भाजप संपवायचं 'कारस्थान' नेमकं कुणाचं? असा प्रश्न 2024 च्या विधानसभेच्या निमित्ताने वारंवार विचारला जात आहे. व हाच मुद्दा पुढे करत यावेळी मावळातील भाजपच्या सर्वसामान्य पदाधिकारी व कार्यकर्ते यांना भडकवले जात आहे.**



यावर बोलताना आमदार सुनील शेळके म्हणाले, मी म्हणजेच भाजपा असे समजणाऱ्या त्या दोन चार नेत्यांच्या नाकर्तेपणामुळे मावळ तालुक्यात भाजपा पक्ष संपत चालला आहे. आता त्यांच्या अपयशाचे खापर ते माझ्यावर फोडत आहेत असा पलटवार त्यांनी संजय तथा बाळा भेगडे व गणेश भेगडे यांच्यावर केला आहे. आमदार सुनील शेळके म्हणाले की, भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांची व सर्वसामान्य कार्यकर्त्यांची दिशाभूल करण्याच्या तुमच्या कारस्थानांमुळेच 2019 मध्ये जनतेचा उद्रेक झाला, जनता माझ्यामागे उभी राहिली व जनतेने निवडणूक हातात घेतली. त्याचा परिणाम म्हणून बाळाभाऊंना पराभव पत्करावा लागला. ज्या पक्षाने आपल्याला व कुटुंबाला सहावेळा संधी दिली. दोनवेळा आमदार केले, मंत्री केले. एकनिष्ठेने प्रामाणिक पाठीशी उभे राहून आपल्या विजयासाठी जीवाचे रान करणाऱ्या सामान्य कार्यकर्त्याला, मतदाराला बाळाभाऊ तुम्ही पराभवानंतर अक्षरशः वाऱ्यावर सोडले.तसेच, पक्षाने सर्वकाही दिल्यानंतर दिल्यानंतरही आपण हार मान्य करू शकला नाही. कोविडच्या संकटात आपण नागरिक व सामान्य कार्यकर्त्याला, पदाधिकाऱ्यांना वाऱ्यावर सोडले. त्यांना लसीकरण, रेमडेसिवीर, ऑक्सिजन सिलेंडर उपलब्ध करून दिले नाही. उपासमारीची वेळ आलेल्या गरजू कुटुंबांच्या दोन वेळच्या जेवणाची सोय करू शकला नाहीत, असा घणाघाती आमदार शेळके यांनी केला आहे.

### केवळ पुढारपणाच्या गप्पा...

पराभवानंतरही भाजपने गेल्या पाच वर्षांत बाळाभाऊंना विविध महत्त्वाची पदे देऊन ताकद देण्याचे, न्याय देण्याचे काम केले. त्याच पद्धतीने त्यांनी पक्षाचे अन्य पदाधिकारी व सामान्य कार्यकर्ते यांना ताकद दिली नाही. तालुक्याला वेळ न देता, आपण तालुक्याबाहेर जाऊन पुढारपणाच्या गप्पा मारण्यातच धन्यता मानली. गेली अडीच वर्षे आपण डीपीडीसीचे सदस्य झाला. जिल्ह्याचे निधीवाटप आपण व गणेशतात्या करतो, असे आपण जाहीरपणे सांगत होता. आता जाहीरपणे सांगा की, तालुक्याला किती निधी आणला, किती बेरोजगारांच्या हाताला कामे दिली, किती कार्यकर्त्यांना कामे दिली? असा सवालही सुनील शेळके यांनी उपस्थित केला.

> विरोधकांचे मोजके दोन-चार खंदे समर्थक पुढारी वगळता बाकी भाजपचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते महायुतीचा धर्म पाळतील व पक्षाच्या आदेशानुसार माझ्या पाठीशी उभे राहतील व भाजपा पक्षाला मजबूत करतील.गेल्या अडीच वर्षात मला त्रास देण्यात आपण कोठेही कमी पडला नाहीत. माझ्या उद्योग-व्यवसायावर राष्ट्रीय हरित लवादाची चौकशी बसवली, प्राप्तिकर विभाग, जीएसटी ऑफिसकडे तक्रारी केल्या. कोणताही संबंध नसताना मला खोट्या गुन्ह्यात गोवून उध्वस्त करण्याचा प्रयत्न केला. एवढे सर्व करण्याऐवजी आपण भाजप कार्यकर्त्यांना व सर्वसामान्य जनतेला वेळ देऊन त्यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले असते तर दुसऱ्याच्या खांद्यावर बंदूक ठेवून तिसऱ्यावर गोळ्या झाडण्याची नामुष्की आपल्यावर ओढवली नसती.
>
> - सुनील शेळके, आमदार, मावळ, उमेदवार, महायुती.

---

## हिंदूंनी सुटकेचा नि:श्वास टाकला

## चंद्रकांत पाटील यांच्या पुढाकारामुळे धार्मिक अतिक्रमणे हटली!

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या धाडसी निर्णयामुळे सुतारवाडी परिसरात मुस्लिमांनी केलेली अतिक्रमणे हटली, आणि हिंदूबहुल असलेल्या या भागातील हिंदूंनी सुटकेचा नि:श्वास टाकला.**



सुतारवाडीत कोणताही तणाव न होता, हा प्रश्न सुटल्यामुळे पुन्हा एकदा या परिसरातील हिंदू- मुस्लिम समाधानाने एकत्र राहू लागले आहेत. त्यामुळे चंद्रकांतदादा यांच्या या कामाचं सध्या मोठ्या प्रमाणात कौतूक होऊ लागले आहे.

मुस्लिम समाजाला सुतारवाडीत कब्रस्तान (दफनभूमी) म्हणून दिलेल्या जागेचा उपयोग इतर धार्मिक कार्यांसाठी करणे, कब्रस्तानच्या जागेवर मशीद उभी करणे, नमाजपठण करणे, धार्मिक शिक्षण देणे, यासारख्या उपक्रमातून या भागात मुस्लिमांकडून वर्चस्व प्रस्थापित करण्याचा उद्योग सुरू होता. एकूणच या सर्व प्रकारांच्या विरोधात स्थानिक हिंदु बांधवांनी एकत्र येऊन संघर्ष उभा केला. मात्र, मशिदीचे अनधिकृत बांधकाम पाडण्यासाठी हिंदूबहुल भागात हिंदूंना प्रशासनाशी तब्बल १५ वर्षांपेक्षा जास्त काळ लढा द्यावा लागला.

### सुतारवाडीतील नागरिकांमध्ये आनंद...

चंद्रकांतदादांनी यामध्ये स्वतः लक्ष घालून हे अनधिकृत बांधकाम हटविण्याच्या सूचना आयुक्तांना दिल्या. त्यानुसार महापालिका आणि पोलीस विभागाने संयुक्त कारवाई करुन हे काम हटवले. त्यामुळे सुतारवाडीतील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. पुण्यामध्ये कोठेही संघर्ष निर्माण होऊ नये, यासाठी चंद्रकांतदादा नेहमीच सक्रिय असतात. त्यांनी गेल्या पाच वर्षात केलेल्या विकासकामांवर कोथरूड परिसरातील मतदार पूर्णपणे समाधानी आहे आणि त्यांनाच पुन्हा विधानसभेवर पाठवण्याचा चंग मतदारांनी बांधला आहे.

### ग्रामस्थ म्हणतात... “आमच्या भविष्यासाठी तुम्ही आमदार होणे महत्त्वाचे”

# ‘बायोडायव्हर्सिटी पार्क’मुळे तळवडेचे नाव राष्ट्रीय स्तरावर..!

## महायुतीचे उमेदवार आमदार महेश लांडगे यांच्या पदयात्रेला प्रतिसाद

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहराच्या लौकीकात भर घालणारा ‘बायोडायर्व्हसिटी पार्क’ (जैवविविधता उद्यान) तळवडे येथे विकसित होत असल्यामुळे एकीकडे निसर्गाचे मूळ स्वरूप अबाधित राहणार आहे. शिवाय या प्रकल्पातून तळवडे आणि आसपासच्या गावांचे आर्थिक परिमान बदलणार आहे. तसेच, राष्ट्रीय स्तरावर गावची ओळख निर्माण होणार आहे. अशा प्रकल्पातून गावाची उन्नती, प्रगती आणि भरभराट करून देणाऱ्या आमदार महेश लांडगे यांना ग्रामस्थांचा एकमुखी पाठिंबा असल्याचा विश्वास तळवडे ग्रामस्थांनी व्यक्त केला.**



भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस-आरपीआय (आठवले) मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार महेश लांडगे यांच्या प्रचारार्थ चिखली तळवडेतील प्रभाग क्रमांक 11 आणि 12 येथे पदयात्रा आयोजित करण्यात आली होती. यावेळी ग्रामस्थांनी या भावना व्यक्त केल्या.

सुदर्शननगर, कोयनानगर, फुलेनगर, शिवाजी पार्क, स्वामी समर्थ कॉलनी, त्रिवेणी नगर, टॉवर लाईन, ताम्हाणे वस्ती येथील श्रीकृष्ण सोसायटी, गणेश सोसायटी, हनुमान सोसायटी, अजिंक्यतारा सोसायटी दरम्यान पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ठिकठिकाणी नागरिकांनी गर्दी करत आमदार महेश लांडगे यांना विजयाच्या ‘हॅट्रिक’ च्या शुभेच्छा दिल्या. आपल्या हॅट्रिकच्या माध्यमातून आमच्या भागाचा विकास होणार आहे. दृष्टिक्षेपात आलेली कामे रखडू नये. यासाठी तुमचे आमदार होणे आमच्या गावाच्या भल्यासाठी आहे, अशा भावना देखील जेष्ठ नागरिकांनी व्यक्त केल्या. यावेळी माजी नगरसेवक, महायुतीचे पदाधिकारी, ग्रामस्थ, सोसायटीधारक यांनी पदयात्रेसाठी पुढाकार घेतला.

### शास्तीकर माफीमुळे मोठा दिलासा...

काँग्रेस आघाडी सरकारने लादलेला शास्तीकर सरसकट माफ करून या भागातील नागरिकांना मोठा दिलासा देण्याचे काम आमदार महेश लांडगे यांनी केले आहे. आमच्या मानगुटीवर बसलेले शास्तीकराचे भूत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातूनच उतरले हे सर्वश्रुत आहे. त्यामुळे आमदार महेश लांडगे यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याचे चिखली तळवडेतील नागरिकांनी ठरवले आहे.

“ मतदारसंघातील प्रत्येक नागरिकाला कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये. यासाठी काळजीपूर्वक लक्ष दिले आहे. अंतर्गत रस्ते, पाणी यांच्या सुविधा पुरविण्याच्या महापालिकेकडे पाठपुरावा केला. चिखली-तळवडेत पर्यायी सात रस्ते विकसित होत आहेत. त्यामुळे या भागातील वाहतूक कोंडीची समस्या सुटणार आहे. वीज व्यवस्थेचा खोळंबा दूर केला आहे. वीज वितरणची अनेक प्रलंबित कामे मार्गी लावली. तसेच येत्या काळात ट्रान्सफॉर्मरची देखील कामे प्रस्तावित आहेत. मुख्य म्हणजे तळवडेतील बायोडायव्हर्सिटी पार्क हे पूर्णत्वाला नेणे महत्त्वाचे काम असणार आहे.

**– महेश लांडगे,** आमदार,
भोसरी विधानसभा. उमेदवार भाजपा महायुती.

---

# पिंपरीतील झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन हाच ‘संकल्प’

## मिशन विधानसभा : आमदार आण्णा बनसोडे यांचे आश्वासन

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी मतदार संघात मेट्रोचे जाळे उभारण्यात येईल. विधानसभा मतदारसंघातील सर्व झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन, अल्प उत्पन्न गटातील नागरिकांना पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत स्वस्त दरात घरे उपलब्ध करण्यावर भर देण्यात येईल असे आश्वासन पिंपरी विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे यांनी फुगेवाडी येथे दिले.**



पिंपरी विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे यांच्या प्रचारार्थ फुगेवाडी, कुंदन नगर परिसरात भव्य पदयात्रा काढण्यात आली. यावेळी भारत नगर बुद्ध विहार येथे तरुणांशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी माजी नगरसेविका उषाताई वाखारे, संध्याताई गायकवाड, माई काटे, किरण मोटे , संजय नाना काटे, प्रशांत फुगे तसेच प्रा. मनोज वाखारे, पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे, ॲड. अतिश लांडगे, निलेश हाके, ओमकार वाखारे, दीपक शिंदे, बादशाह भाई शेख, अख्तर शेख, युवराज गायकवाड, बाळाभाऊ ढवाण, अनिकेत डोळस, सागर फुगे आदी कार्यकर्ते उपस्थित होते. आमदार बनसोडे म्हणाले की, शहरातील मतदार संघातील पाच रेल्वे स्टेशनचे सुशोभीकरण, दापोडी येथील त्रैलोक्य बौद्ध विहारास आंतरराष्ट्रीय दर्जाचे तीर्थक्षेत्र म्हणून घोषित करणे, vvज्येष्ठ नागरिक संघासाठी अध्ययावत जेष्ठ नागरिक भवन उभारणे यासाठीही आपण प्रयत्न करणार आहोत.

### माता-भगिनींकडून विजयासाठी शुभेच्छा..

आमदार बनसोडे यांनी फुगेवाडी येथील विठ्ठल मंदिर तसेच छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे पुष्पहार अर्पण करून नतमस्तक होत पदयात्रेला सुरुवात केली. ओमकार मित्र मंडळ (साई मंडळ), आझाद मंदिर मंडळ, संजय नगर, मस्जिद, वाखारे चाळ, श्री स्वामी समर्थ चौक, जय महाराष्ट्र चौक, स्टार स्पोर्ट्स कॉर्नर, नवरंग मित्र मंडळ, वेताळ बाबा मंदिर, स्टार स्पोर्ट्स, साईनाथ मित्र मंडळ, रविलाल वस्ती, भारत नगर बुद्ध विहार, सुभाष तरुण मंडळ या मार्गाने येत कुंदन नगर येथे पदयात्रेची सांगता करण्यात आली. या पदयात्रेत आमदार अण्णा बनसोडे यांनी ज्येष्ठांचे आशीर्वाद घेत तरुणांशी संवाद साधला. ठिकठिकाणी महिला भगिनींनी त्यांना औक्षण करून विजयासाठी शुभेच्छा दिल्या.




# प्रचारात लोकांचे मुद्दे हरले

**कमला हॅरिस म्हणजे ‘गर्भपात-बंदीला विरोध, महिलांना प्रजोत्पादनाबद्दल निर्णयस्वातंत्र्य’ आणि डोनाल्ड ट्रम्प म्हणजे ‘स्थलांतरितांना अटकाव’ आणि ‘आयातीवरील कर (टॅरिफ) वाढवणे’ हेच मुद्दे अमेरिकी राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणूक- प्रचारातून सातत्याने लोकांपर्यंत पोहोचत होते.**

अधूनमधून कमला हॅरिस यांनी बड्या किराणा दुकानांच्या- सुपरमार्केट्सच्या- नफेखोरीचा विषय भाषणांमध्ये आणला; या नफेखोरीला आपण चाप लावणार असे त्या म्हणाल्या. त्यावर ट्रम्प यांनी ‘महागाई वाढली कोणाच्या काळात?’ असे प्रत्युत्तर दिले आणि मग हॅरिस यांनीही महागाईचा विषय फारसा वाढवला नाही.अमेरिका हा देश स्वत:ला कालपरवापर्यंत ‘सर्वांत महान लोकशाही’ म्हणवत होता, कदाचित यापुढेही कुणी तसे म्हणत राहील... पण अमेरिकेच्या ४७ व्या राष्ट्राध्यक्षांच्या निवडीसाठी झालेल्या निवडणुकीत ‘लोकशाही’ कितपत होती? प्रचारात लोकांच्या जिव्हाळ्याचे मुद्दे कितपत होते? आरोग्यसेवेचा मुद्दाच दोघांच्याही प्रचारात नव्हता. अमेरिकेतली आरोग्यसेवा अत्यंत महाग आहे, न परवडणारी आहे, हे खरे दुखणे. पण ट्रम्प यांनी २०१६ च्या प्रचारात तर, ‘ओबामाकेअर’ म्हणून त्या वेळी गाजावाजा झालेली राष्ट्रव्यापी आरोग्य विमा योजना बंद करून टाकू, असेही म्हटले होते. तसे काही त्यांनी पहिल्या कारकीर्दीत



केले नाही. पण या वेळी त्यांनी आरोग्यसेवेसाठी जणू, अमेरिका एकदा का पुन्हा महान झाली की सारे अमेरिकन लोक खडखडीत बरे होणार, असा सूर लावला... आपण पुन्हा निवडून आल्यास पुढल्या चार वर्षांत अमेरिकनांमध्ये कर्करोगाचे प्रमाण निम्म्याने कमी होईल, असे ट्रम्प म्हणाले! हॅरिस यांनी काही इन्शुलिन स्वस्त करण्याचे आश्वासन एका प्रचारसभेत दिले. पेनसिल्व्हानियातील रहिवाशांना आरोग्यसेवेसाठी घ्यावी लागलेल्या कर्जांतून मुक्त करण्यासाठी ४० लाख डॉलरच्या निधीची घोषणा पेनसिल्व्हानियाचे गव्हर्नर आणि हॅरिस यांच्या सोबतीने उपाध्यक्षपदाची निवडणूक लढवण्यास उत्सुक असलेले जोश शॅपिरो यांनी केली होती; याचा उल्लेख शॅपिरोंची निवड हॅरिस यांनी केली नसूनही त्या राज्यात, हॅरिस यांच्या प्रचारासाठी होत राहिला, पण मुळात पेनसिल्व्हानियातील रहिवाशांची आरोग्य-कर्जे ४० कोटी डॉलरच्या वर आहेत... ४० लाखांत ते कर्जमुक्त कसे होणार, हा प्रश्न कुणालाच पडला नाही, इतका आरोग्याचा मुद्दा वरवरचा राहिला. अमेरिकेतील संघटित कामगारांचे दोन मोठे संप जो बायडेन यांच्या कार्यकाळात झाले. पहिला युनायटेड मोटर्समध्ये आणि दुसरा गोदी कामगारांचा संप. हे दोन्ही संप – विशेषत: गोदी संप- मिटवण्यात बायडेन प्रशासनाने पुढाकार घेतला होता. पण कामगारांना कामाचे ठराविक तास आणि कामाचे योग्य दाम मिळवून देण्याचा मुद्दा बायडेन यांच्याच प्रशासनात गेली साडेतीन वर्षे उपाध्यक्ष म्हणून काम करणाऱ्या हॅरिस यांना काढावासा वाटला नाही. ट्रम्प हे या मुद्द्यापासून अर्थातच दूर होते. ते केवळ अमेरिकी ‘भूमिपुत्रां’ना रोजगार मिळवून देण्याच्या बाता करत होते, कामगारांचे हक्क वगैरे त्यांच्या गावीही नव्हते. तरीही कामगारवर्गीयांची पसंती ट्रम्प यांना असल्याचे ताजा निकाल सांगतो आहे, कारण या हक्कांच्या ऐवजी ट्रम्प यांनी अमेरिकी अस्मितेचा आणि ‘स्थलांतरित’ या काल्पनिक शत्रूचा गवगवा प्रचारात केला. याउलट, कामगारांची प्रतिष्ठा वाढवण्याचा मुद्दा हॅरिस यांना मते मिळवून देणारा ठरला असता. पण आधीच विनाकारण ‘डाव्या’ असा शिक्का बसलेल्या हॅरिस यांनी कामगार हक्कांची भाषा कधी केली नाही आणि प्रचारात ‘डावे’ दिसणाऱ्या मुद्द्यांना स्थान देणे त्यांनी टाळले, असा निष्कर्ष आता निघतो. ‘जॅकोबिन’ तसेच ‘द न्यू रिपब्लिक’ सारख्या, अमेरिकेच्या दृष्टीने डाव्या राजकारणाचा मवाळ पुरस्कार करणाऱ्या नियतकालिकांनी तर ‘कमला हॅरिस यांचा प्रचार अभिजनवर्गापुरताच राहिला’ असा निष्कर्षही काढलेला आहे.मदतीने पेनसिल्व्हानिया या राज्यातील एक हजार कामगारवर्गीय मतदारांना ‘जॅकोबिन’ने प्रश्न विचारले आणि उत्तरांची विभागणी, त्यांतून दिसलेल्या कलानुसार सात गटांमध्ये केली – ‘टोकाचा लोकानुनय’ (जो ट्रम्प करत होतेच), ‘प्रागतिक अर्थकारण’, ‘फार धाडसी निर्णय न घेणारे अर्थकारण’, ‘सौम्य लोकानुनय’ (जो हॅरिस यांनीसुद्धा केला), ‘गर्भपाताचा हक्क हवाच’, ‘स्थलांतरामुळे काही बिघडत नाही’ आणि ‘लोकशाहीला धोका आहे.

## प्रासंगिक »

# तो परत आलाय

***संकुचितवादी नेते मंडळी स्वत:ला जड जाणाऱ्या आव्हानांसाठी इतरांस बोल लावतात. अशांचे ट्रम्प हे मेरुमणी...***

व्यक्ती असो वा व्यक्तींचा समाज; चांगल्याची अपेक्षा असलेल्याकडून अपेक्षाभंग झाला की पुढची संधी वाईटास द्यावी असे बहुसंख्यांस वाटते. अमेरिकेतील ताज्या निवडणूक निकालातून या सत्याची प्रचीती यावी. बेभरवशी ट्रम्प यांचा पराभव करून अध्यक्षपद मिळवणारे जो बायडेन यांचा गेल्या चार वर्षांतील कारभार अगदीच फिका होता; हे खरे. देशांतर्गत पातळीवर आणि जागतिक पातळीवरही ते अत्यंत निष्प्रभ ठरले, हेही खरे. एकमेव जागतिक महासत्तेचा हा प्रमुख रशिया-युक्रेन आणि इस्रायल- हमास युद्ध रोखू शकला नाही, हे खरे नाही असे कोण म्हणेल? बायडेन यांची शेवटची दोन वर्षे अगदीच केविलवाणी गेली, हे तर खरेच खरे. या काळात त्यांची काही कृती, स्मरणात राहण्याऐवजी बायडेन यांची विस्मरणशीलताच अधिक स्मरणीय ठरली. त्यातूनच या जरठाने अध्यक्षपदाच्या शर्यतीत पुन्हा राहावे की न राहावे याचा घोळ घातला गेला.

सर्वांत वेगवान, सर्वांत लांबलचक, सर्वांत उंच, सर्वांत भव्य... सारं कसं चकाचक दिसलं पाहिजे. नद्या कितीही प्रदूषित असू देत रिव्हरफ्रन्ट मात्र लख्ख हवा, नव्या कोऱ्या उड्डाणपुलांवर खड्डे पडले तरी चालतील, पण त्यांची ग्राफिटीने वारंवार रंगरंगोटी मात्र झालीच पाहिजे.

# महाशक्तीचं स्वप्न पाहणाऱ्या देशात एवढी ‘पडझड’

एखादी जागतिक परिषद होतेय, गरिबी- अस्वच्छता पडदे लावून झाकून ठेवा, परदेशी पाहुण्यांना सारं काही आंतरराष्ट्रीय दर्जाचं दिसलं पाहिजे. भविष्याचा विचार सोडा. वर्तमानात जगा. उद्घाटनापुरतं तरी सारं काही भव्यदिव्य असलं पाहिजे. फोटो व्हिडीओमध्ये सुंदरच दिसलं पाहिजे. घर ते बाजार, शाळा, ऑफिस या रोजच्या ५-१० किलोमीटरमध्ये कितीही खड्डे, गर्दी, विलंब चालेल, प्राधान्य मात्र बुलेट ट्रेनला हवं... देशातल्या पायाभूत सुविधांबाबत असाच काहीसा दृष्टिकोन दिसू लागला आहे.पंतप्रधानांच्याच हस्ते २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्येतल्या बहुप्रतीक्षित राममंदिरात श्री रामांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

भव्य सोहळा झाला. आणि अवघ्या सहा महिन्यांत जून २०२४मध्ये गाभाऱ्यालगतच्या मंडपाला गळती लागली. नूतनिकरण झालेल्या अयोध्या रेल्वे स्थानकाचा परिसर जलमय झाला. राम पथावर खड्डे पडले, पाणी साचलं. पाण्याचा तातडीने उपसा करण्यात



आला, मात्र भाविकांना चिखलातून जावं लागलं. मंदिराची संगमरवरी फरशी कळकट तर झालीच शिवाय त्यावरून पाय घसरू लागले. संबंधित यंत्रणांनी मंदिराचं बांधकाम अद्याप पूर्ण झालेलं नाही, वरचे भाग खुलेच असल्यामुळे पाणी वाहून खाली आलं, असं स्पष्टीकरण दिलं.

पण बांधकाम अर्धवट असताना प्राणप्रतिष्ठा करण्याची घाई का केली हा त्यावेळी शंकराचार्यांनी उपस्थित केलेला प्रश्न पुन्हा एकदा अधोरेखित झाला. ४ डिसेंबर २०२३... सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या राजगड किल्ल्यावर पंतप्रधानांच्या हस्ते शिवरायांच्या ३५ फुटी पुतळ्याचं अनावरण झालं आणि अवघ्या नऊ महिन्यांत २८ ऑगस्ट २०२४ रोजी पुतळा कोसळला. महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली.पंतप्रधानांनी १२ जानेवारी २०२४ रोजी मुंबई आणि नवी मुंबईला जोडणाऱ्या, तब्बल १८ कोटी रुपये खर्च करून उभारलेल्या अटल सेतूचं उद्घाटन केलं. लगोलग छायाचित्रं, चित्रफिती व्हायरल झाल्या. या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या लांबलचक पुलावरून विहंगम दृश्य पाहत प्रवास करण्यासाठी मुंबई, नवी मुंबईकरांची रिघ लागली आणि पाचच महिन्यांत २१ जून २०२४ रोजी बातमी आली- अटल सेतूला तडे गेले.

जबलपूर एअरपोर्टच्या नव्या टर्मिनलचं छत २८ जून २०२४ रोजी कोसळलं. हे छत म्हणजे विमानतळाचं सौंदर्य वाढवण्याच्या दृष्टीने उभारलेली कापडी कानॉपी होती. पावसाचं पाणी त्यावर साठलं आणि ती फाटून खालून जाणाऱ्या वाहनावर कोसळली. गाडीच्या छताचा आणि काचांचा अक्षरशः चक्काचूर झाला. या टर्मिनलचं आवघ्या तीनच महिन्यांपूर्वी १० मार्च २०२४ रोजी उद्घाटन झालं होतं- पंतप्रधानांच्याच हस्ते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# 48 तासांत मशिदीवरचे भोंगे काढतो

## मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची वरळी मतदारसंघात जाहीर सभा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी राज्यात सुरु आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदान आणि २३ नोव्हेंबर रोजी या निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे. त्यामुळे २३ नोव्हेंबरच्या दिवसाकडे अनेकांचे लक्ष लागलेलं आहे. या निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडीत मुख्य लढत पाहायला मिळणार आहे. सध्या राज्यभरात विविध मतदारसंघात दिग्गज नेत्यांच्या प्रचार सभा सुरु आहेत. या सभांच्या माध्यमातून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु असल्याचंही पाहायला मिळत आहे. आज मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची मुंबईतील वरळी मतदारसंघात जाहीर सभा पार पडली.**

या सभेत बोलताना राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे, शरद पवार, अजित पवार यांच्यावर हल्लाबोल केला. तसेच यावेळी राज ठाकरे यांनी पुन्हा एकदा मशिदीवरचे भोंगेंच्या विषयावरून मोठं भाष्य केलं आहे."सत्ता हातात द्या, पहिल्या ४८ तासांत मशिदीवरचे भोंगे काढतो", असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे."उद्धव ठाकरे कसे मुख्यमंत्री झाले हे सर्वांना माहिती आहे. सध्याच्या काळात काहीही विचारधारा उरलेली नाही. २०१९ नंतर कोणाचं सरकार येणार? हेच आपण पाहत बसलो होतो. एकेदिवशी सकाळी ६ वाजता कळलं की अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस हे शपथ घेत आहेत. आधी तर विश्वासच बसला नाही. आर्धा तास ते लग्न टिकलं. आर्ध्या तासाच घटस्फोट झाला. त्यानंतर लगेच उद्धव ठाकरे यांनी राष्ट्रवादी आणि काँग्रेस बरोबर गेले. मग यांना काही जणाची नाही आणि मनाची नाही. ज्यांच्या विरोधात निवडणुका लढवल्या त्यांच्या बरोबर सत्तेत जाऊन बसले. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाल्यानंतर अडीच वर्ष बाळासाहेब ठाकरे यांच्या अनेक बॅनर्सवरील नावापुढंचं हिंदूहृदयसम्राट हे नाव काढलं. हे का काढलं तर राष्ट्रवादी आणि काँग्रेसला वाईट वाटेल आणि त्यांना ते परवडणारं नाही. तसेच काही उर्दू बॅनर्सवर जनाब बाळासाहेब ठाकरे नाव टाकलं. आज ते हयात असायला हवे होते. त्यांनी एकएकाला फोडून काढलं असतं", असा हल्लाबोल राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केला."आज काही मौलवी फतवे काढत आहेत. काय फतवे काढत आहेत? तर सर्वच्या सर्व मते हे महाविकास आघाडीच्या पारड्यात टाकावी. जर ते फतवे काढत असतील तर आज मी देखील फतवा काढतो. येणाऱ्या निवडणुकीमध्ये माझे ज्या मतदारसंघात उमेदवार असतील तेथे जनतेने आमच्या पाठीशी उभे राहावं. उद्या सत्ता हातात दिल्यानंतर पहिल्या ४८ तासांत सर्व मशिदीवरचे भोंगे पहिल्या पहिल्या ४८ तासांत खाली उतरवले ना? तर परत राजकारण सांगणार नाही. जर त्यांनी अंगावर येण्याचा प्रयत्न केला२३ नोव्हेंबर रोजी या निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे. त्यामुळे २३ नोव्हेंबरच्या दिवसाकडे अनेकांचे लक्ष लागलेलं आहे. या निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडीत मुख्य लढत पाहायला मिळणार आहे.



### आर्धा तास ते लग्न टिकलं

सध्या राज्यभरात विविध मतदारसंघात दिग्गज नेत्यांच्या प्रचार सभा सुरु आहेत. या सभांच्या माध्यमातून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु असल्याचंही पाहायला मिळत आहे. आज मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची मुंबईतील वरळी मतदारसंघात जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे, शरद पवार, अजित पवार यांच्यावर हल्लाबोल केला. तसेच यावेळी राज ठाकरे यांनी पुन्हा एकदा मशिदीवरचे भोंगेंच्या विषयावरून मोठं भाष्य केलं आहे. "सत्ता हातात द्या, पहिल्या ४८ तासांत मशिदीवरचे भोंगे काढतो", असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे."उद्धव ठाकरे कसे मुख्यमंत्री झाले हे सर्वांना माहिती आहे. सध्याच्या काळात काहीही विचारधारा उरलेली नाही. २०१९ नंतर कोणाचं सरकार येणार? हेच आपण पाहत बसलो होतो. एकेदिवशी सकाळी ६ वाजता कळलं की अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस हे शपथ घेत आहेत. आधी तर विश्वासच बसला नाही. आर्धा तास ते लग्न टिकलं.

# लेवा पाटीदार समाजाचा भव्य-दिव्य वधू-वर मेळावा

## डिजीटल पध्दतीने शिक्षणानुसार प्राथमिकता दर्शक ॲप

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आपणांस कळविण्यात आनंद होत आहे की, आंतरराष्ट्रीय विवाहेच्छू वधू-वर पालक मेळावा कार्यक्रम शनिवार दि. ०९/११ / २०२४ रोजी सकाळी ८.३० ते सायं. ४.०० वा. ठिकाण: पाटीदार भवन, गणेश तलावाजवळ, निगडी, प्राधिकरण, पुणे - ४११०४४ ऑफलाईन पध्दतीने आयोजित करण्याचे मंडळाने योजिले आहे.**

तरी ऑनलाईन माध्यमातून WWW. SAMATABHATRUMANDAL. COM या संकेतस्थळावर करण्याची सुविधा मंडळाने केली आहे, तसेच हॉलवरती सुध्दा प्रवेश दिला जाईल. मा.श्री. किरण प्रभाकर पाटील उद्योजक, श्री. अनिल पतरणे उद्योजक, श्री. शिवाजी साकेगांवकर उद्योजक, उद्योजिका सौ. संगिता विलास बोरोले, सत्तारूढ पक्षनेते मा. नामदेव जनार्दन ढाके, डॉ. मुकेश फालक, डॉ. सागर राणे, डॉ. तुषार खाचणे व समता भ्रातृ मंडळ कार्यकारिणी व लेवा पाटीदार मित्र मंडळ कार्यकारिणी उपस्थित राहणार आहेत. तरी आपण या मेळाव्याला उपस्थित रहावे ही विनंती.आंतरराष्ट्रीय ऑफलाईन मेळावा लाईव्ह ठेवला आहे. उच्च तंत्रज्ञानाच्या माध्यमातुन ANDROID APP ची सुविधा वधू-वर पालकांना देणार. रंगीत (कलर) वधू-वर सुचीची हार्ड / सॉफ्ट कॉपीसुध्दा उपलब्ध. सर्व समाज बांधवांना टोल फ्री नं. ०२० - ७११७३७३३ उपलब्ध.क्षणानुसार प्राथमिकता दर्शक ॲप. ॲपद्वारे वधू-वर पालकांना एकाच वेळेस संभाषण व लग्न ठरविण्याविषयी पूर्ण चर्चा करण्यास योग्य व तसेच प्रत्यक्ष भेटकक्ष उपलब्ध.



### प्रत्यक्ष भेटकक्ष उपलब्ध

आंतरराष्ट्रीय ऑफलाईन मेळावा लाईव्ह ठेवला आहे. उच्च तंत्रज्ञानाच्या माध्यमातुन ANDROID APP ची सुविधा वधू-वर पालकांना देणार. रंगीत (कलर) वधू-वर सुचीची हार्ड / सॉफ्ट कॉपीसुध्दा उपलब्ध. सर्व समाज बांधवांना टोल फ्री नं. ०२० - ७११७३७३३ उपलब्ध.क्षणानुसार प्राथमिकता दर्शक ॲप. ॲपद्वारे वधू-वर पालकांना एकाच वेळेस संभाषण व लग्न ठरविण्याविषयी पूर्ण चर्चा करण्यास योग्य व तसेच प्रत्यक्ष भेटकक्ष उपलब्ध. आंतरराष्ट्रीय विवाहेच्छू वधू-वर पालक मेळावा कार्यक्रम शनिवार दि. ०९/११ / २०२४ रोजी सकाळी ८.३० ते सायं. ४.०० वा.

# जम्मू काश्मीर विधानसभेत आमदार भिडले!

## कलम 370 च्या मुद्द्यावरून सभागृहात घमासान!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सहा वर्षांनंतर स्थापन झालेल्या जम्मू काश्मीरच्या विधानसभेत आज खडाजंगी झाली. कलम ३७० पुन्हा लागू करण्याची मागणी अपक्ष आमदार शेख खुर्शीद यांनी केली. हातात फलक घेऊन ते विधानसभेत आल्याने गदारोळ झाला. या फलकाला भाजपा आमदारांनी वेलमध्ये येऊन निषेध नोंदवला. तर या दरम्यान दोन्ही पक्षाच्या आमदारांमध्ये हातापायीही झाली.**



खासदार इंजिनिअर रशिद यांचे बंधू अपक्ष आमदार खुर्शीद शेख कलम ३७० पुन्हा लागू करणे आणि सर्व राजकीय कैद्यांची सुटका करण्याच्या मागणीसाठी फलक घेऊन सभागृहाच्या वेलमध्ये आले. खुर्शीद यांच्याकडून बॅनर काढून घेण्याच्या प्रयत्नात भाजपा आमदारांनीही वेलमध्ये धडक दिल्याने बाचाबाची झाली. सज्जाद लोन, वाहिद पारा आणि काही नॅशनल कॉन्फरन्स सदस्यांनीही खुर्शीद यांना समर्थन दिले. त्यामुळे भाजपाचे आमदार इतर आमदारांबरोबर भिडले. विधानसभेचे अध्यक्ष अब्दुल रहीम राथेर यांच्या निर्देशनानुसार तीन आमदारांना वेलमधून बाहेर काढण्यात आले. जम्मू-काश्मीरला पूर्वीप्रमाणे विशेष राज्याचा दर्जा देण्याच्या ठरावावरून विधानसभेत बुधवारी जोरदार खडाजंगी झाली. अतिशय गोंधळात पूर्वीप्रमाणे जम्मू-काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा देण्याचा ठराव चर्चेविना मंजूर करण्यात आला. मात्र, भाजपा सदस्यांनी या वेळी गोंधळ घालून ठरावाच्या प्रती सभागृहात फाडून टाकल्या आणि अध्यक्षांविरोधात घोषणाबाजी केली. बुधवारी वादळी चर्चा झाल्यानंतर आज (७ नोव्हेंबर, गुरुवार) पुन्हा भाजपा आमदारांनी वेलमध्ये येऊन गोंधळ घातला. खासदार इंजिनिअर रशिद यांचे बंधू अपक्ष आमदार खुर्शीद शेख कलम ३७० पुन्हा लागू करणे आणि सर्व राजकीय कैद्यांची सुटका करण्याच्या मागणीसाठी फलक घेऊन सभागृहाच्या वेलमध्ये आले. खुर्शीद यांच्याकडून बॅनर काढून घेण्याच्या प्रयत्नात भाजपा आमदारांनीही वेलमध्ये धडक दिल्याने बाचाबाची झाली. सज्जाद लोन, वाहिद पारा आणि काही नॅशनल कॉन्फरन्स सदस्यांनीही खुर्शीद यांना समर्थन दिले. त्यामुळे भाजपाचे आमदार इतर आमदारांबरोबर भिडले. विधानसभेचे अध्यक्ष अब्दुल रहीम राथेर यांच्या निर्देशनानुसार तीन आमदारांना वेलमधून बाहेर काढण्यात आले.आज विधानसभेचे कामकाज सुरु होताच बारामुल्लाचे खासदार इंजिनियर रशीद यांचे बंधू, आमदार खुर्शीद अहमद शेख यांनी कलम 370 वर बॅनर सभागृहात दाखवले. त्यावर विरोधी पक्षनेते सुनील शर्मा यांनी तीव्र आक्षेप घेतला. सत्ताधारी-विरोधी आमदारांमध्ये हाणामारी झाली. सभागृहात काही काळ प्रचंड तणाव निर्माण झाला.सभागृहाचे कामकाज काही काळासाठी तहकूब करण्यात आले.सोमवार ४ नोव्हेंबर रोजीही विधानसभा अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्याला विशेष दर्जा बहाल करणारे कलम ३७० पुनर्संचयित करण्याचा प्रस्ताव 'पीडीपी'च्या आमदार वाहिद पारा यांनी मांडला. या प्रस्तावाला भाजपच्या आमदारांनी तीव्र निषेध केला होता. यानंतर विधानसभेत प्रचंड गदारोळ झाला होता. जम्मू-काश्मीर विधानसभेत पीडीपीचे आमदार वाहिद पारा यांनी कलम 370 मागे घेण्याचा प्रस्ताव मांडला. जम्मू-काश्मीरला पुन्हा एकदा विशेष राज्याचा दर्जा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. विधानसभेत या प्रस्तावावरून भाजप आणि पीडीपी आमदारांमध्ये जोरदार वादावादी झाली होती.आमदार खुर्शीद अहमद शेख यांनी कलम 370 वर बॅनर सभागृहात दाखवले. त्यावर विरोधी पक्षनेते सुनील शर्मा यांनी तीव्र आक्षेप घेतला. सत्ताधारी-विरोधी आमदारांमध्ये हाणामारी झाली. सभागृहात काही काळ प्रचंड तणाव निर्माण झाला. सभागृहात गोंधळ घालणाऱ्या काही विरोधी आमदारांना मार्शल्सनी ताब्यात घेतले.

### ठरावात नेमकं काय?

विधानसभेत हाणामारी सुरू असतानाच पीडीपीच्या वाहिद पारा, फयाज मीर आणि पिपल्स कॉन्फरन्सचे सज्जाद गनी लोन यांनी विशेष दर्जा बहाल करण्याच्या मागणीसाठी आणखी एक ठराव मांडला. या ठरावावर शेख खुर्शीद यांचीही स्वाक्षरी आहे. "हे सभागृह स्पष्टपणे कलम ३७० आणि कलम ३५ ए त्यांच्या मूळ, अपरिवर्तित स्वरूपात त्वरित पुनर्संचयित करण्याची मागणी करते आणि जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना कायदा, २०१९ द्वारे लागू केलेले सर्व बदल मागे घेण्याची मागणी करते. आम्ही भारत सरकारला विनंती करतो की या कायद्याचा आदर करावा. जम्मू आणि काश्मीरची वेगळी ओळख, संस्कृती आणि राजकीय स्वायत्तता जपण्याच्या उद्देशाने सर्व विशेष तरतुदी आणि हमी पुनर्संचयित करा", असं या ठरावात नमूद होतं.

# दाऊद अन् लॉरेन्स बिश्नोईच्या फोटोंचे टी-शर्ट

## विक्री करणाऱ्या ई कॉमर्स वेबसाईटवर पोलिसांकडून गुन्हे दाखल

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कुख्यात गुंड दाऊद इब्राहिम आणि तुरुंगात असलेला गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई ही दोन नावे गेल्या काही दिवसांपासून गुन्हेगारी विश्वात आणि माध्यमांमध्ये सातत्याने झळकत आहेत. माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या हत्येनंतर लॉरेन्स बिश्नोई हे नाव पुन्हा चर्चेत आले, तर अभिनेता सलमान खानच्या घरावरील गोळीबारामुळे बिश्नोई गँगकडूनच बाबा सिद्दीकींची हत्या करण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.**








कायद्यान्वये कुख्यात गुंड दाऊद इब्राहिम आणि लॉरेन्स बिश्नोई हे दोघेही गंभीर गुन्हेगार आहेत. मात्र, या दोघांचे अनुकरण करण्यासाठी काही तरुणाई पुढे येत आहे. विशेष म्हणजे या दोघांचे अनुकरण करणारे टी-शर्ट आणि वापरातील वस्तूंची खुलेआम विक्री होत असल्याच्या घटना उघडकीस आल्यानंतर सायबर गुन्हे विभागाने कारवाईचा बडगा उगारला आहे. संबधित वस्तूंची ऑनलाईन विक्री करणाऱ्या ई कॉमर्स वेबसाईटवर पोलिसांकडून गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दाऊद इब्राहिम व गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई यांचे छायाचित्र असलेले टी-शर्ट प्रिंट करुन त्याची विक्री होत असल्याचे पाहायला मिळत आहे. महाराष्ट्र सायबर विभागाने तत्काळ या घटनेची गंभीर दखल घेत संबंधित ई-कॉमर्स वेबसाईट आणि विक्रेत्यांविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला आहे. अनेक ई-कॉमर्स प्लेटफॉर्मवरुन गँगस्टर लॉरेंस बिश्नोई आणि अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम यांचे छायाचित्र असलेले टी-शर्ट विक्री करण्यात आले आहेत

### विक्री करणाऱ्यांवरही कारवाई


.वस्तू समाजिक मुल्यांचं अध:पतन करणाऱ्या असून समाजातील गुन्हेगारी प्रवृत्तीला बळ देणाऱ्या आहेत. महाराष्ट्रा सायबर विभागाने फ्लिपकार्ट, अलीएक्सप्रेस, टीशॉपर आणि एट्सी यांसारख्या ई-कॉमर्स वेबसाईट व विक्रेता प्लॅटफॉर्मवर भारतीय न्याय संहिता (बीएनएस), 2023 च्या कलम 192, 196, 353, 3 आणि आयटी अधिनियम, 2000 च्या धारा 67 अन्वये एफआयआर दाखल केली आहे. त्यामुळे, यापुढे अशा प्रकारच्या वस्तूंची विक्री करणाऱ्यांवरही पोलिसांकडून कारवाई केली जाऊ शकते.

# माझ्या नवऱ्याला हिंदी येत नाही




'तेजाब', 'खलनायक', 'दिल तो पागल हैं', 'हम आपके है कौन', 'राम लखन', 'देवदास' अशा एकापेक्षा एक गाजलेल्या चित्रपटांमध्ये काम करून मराठमोळी माधुरी दीक्षित बॉलीवूडची 'धकधक गर्ल' झाली. तिचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे.सिनेविश्वात ४० वर्षे पूर्ण होणार असल्याने अभिनेत्री सध्या USA दौऱ्यावर आहे. माधुरी याठिकाणी तिच्या असंख्य चाहत्यांशी संवाद साधणार आहे. USA दौरा सुरू करण्यापूर्वी न्यू जर्सी येथे अभिनेत्रीने नुकतीच पत्रकार परिषद घेतली. यावेळी माधुरीला पत्रकारांनी "तुम्ही डॉ. श्रीराम नेने यांच्याशी संवाद साधताना कधी बॉलीवूड चित्रपटातील गाणी गायली आहेत का किंवा चित्रपटातले संवाद वापरले आहेत का?" असा प्रश्न विचारला. यावर अभिनेत्रीने दिलखुलासपणे उत्तर दिलं आहे.

# जॉन अभिनेता नसता तर मेकॅनिक असता



अभिषेक बच्चन आणि जॉन अब्राहमची मैत्री कोणापासूनही लपलेली नाही. अभिषेकने जॉनबद्दल बोलताना, तो अभिनेता नसून मेकॅनिक व्हायला हवा होता, असे म्हटले आहे. त्याला बाइक्सची खूप आवड आहे. बाईक चालवण्याबरोबरच तो त्यांना असेंबलही करतो. त्याला बाईकशी छेडछाड करायला आवडते. नशिबाने त्याला अभिनेता बनवले, नाहीतर तो कुठेतरी मेकॅनिक झाला असता, असे त्याने म्हटले. अभिषेकने एका जुन्या मुलाखतीत सांगितले होते की, जॉन अब्राहमनेच त्याला बाइक चालवायला शिकवले होते. आधी अभिषेक बाईक चालवताना घाबरला होता. अभिषेक आणि जॉनने धूम चित्रपटात एकत्र काम केले होते. चित्रपटाचा केंद्रबिंदू सुपर बाईकच होत्या. अभिषेक बच्चन त्याच्या आगामी 'घूमर' चित्रपटामुळे चर्चेत आहे. चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान त्याला बाइकबाबतही काही प्रश्न विचारण्यात आले. तो म्हणाला- माझा एक मित्र आहे, जॉन अब्राहम. मला वाटते की त्याला बाईक खूप आवडतात. तो आधी बाईक डिस्मेंटल करतो आणि नंतर पुन्हा असेंबल करतो. त्याला हे काम खूप आवडते. मी त्याच्याकडून बाइक्सबद्दल खूप काही शिकलो आहे.

# सुशांत निष्ठावंत नव्हता



अभिनेता सैफ अली खान याची लेक आणि अभिनेत्री सारा अली खान हिने अभिनेता सुशांत सिंह राजपूत याच्यासोबत बॉलिवूड करियरला सुरुवात केली. पहिल्याच सिनेमातून सारा, सुशांत याच्यासोबत दिसली. सिनेमा प्रदर्शित झाल्यानंतर दोघांना अनेक ठिकाणी एकत्र स्पॉट देखील करण्यात आलं. शिवाय दोघांच्या रिलेशनशिपच्या चर्चांनी देखील जोर धरला. पण अभिनेत्याच्या अचनाक निधनानंतर चाहत्यांना देखील मोठा धक्का बसला.सुशांत सिंह राजपूत हत्या प्रकरणात एनसीबीने सारा अली खान हिला चौकशीसाठी बोलावलं होतं. तेव्हा अभिनेत्रीने मोठा खुलासा केला होता. रिपोर्टनुसार, सारा हिने सुशांत डेट करत असल्याचं सांगितलं होतं. पण अभिनेत्रीने त्यांच्या ब्रेकअपचं कारण देखील सांगितलं...सारा हिने दिलेल्या माहितीनुसार, नात्यामध्ये सुशांत कधीच निष्ठावंत नव्हता. सारा म्हणाली होती, 'सुशांत प्रचंड पजेसिव होता. माझ्या आगामी सिनेमा सुशांतला कास्ट करा... असं दिग्दर्शकांना जाऊन सांग. असं तो सतत म्हणायचा...' याचदरम्यान, सारा हिने ड्रग्स सेवनाबद्दल देखील मोठं वक्तव्य केलं होतं. ' मी सिगारेट ओढली होती...' अशी कबुली साराने चौकशीमध्ये दिली होती. लोनावळा याठिकाणी सुशांत सिंह राजपूत याचा एक फार्महाऊस आहे. अभिनेत्याच्या निधनानंतर फार्महाऊसच्या केअरटेकरने IANS ला महत्त्वाची माहिती दिली होती. केअरटेकरने दिलेल्या माहितीनुसार, अभिनेता 2019 मध्ये सारा हिला प्रपोज देखील करणार होता.

# मला हेच करायचे आहे'

नुकत्याच पार पडलेल्या फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात अभिनेत्री नुसरत भरुचाने परिधान केलेला गाऊन सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला. काहींनी तिच्या या बोल्ड लूकची स्तुती केली तर अनेकांनी कपड्यांच्या स्टाइलवरून टीका केली. ट्रोलिंगला न जुमानता मला जसं वागायचं आहे तसंच मी वागेन असं बेधडक उत्तर नुसरत टीकाकारांना दिलं आहे. 'टाइम्स ऑफ इंडिया'ला दिलेल्या मुलाखतीत नुसरतने ट्रोलिंगवर प्रतिक्रिया दिली आहे. "सध्याची सोशल मीडियावरची परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची आहे. त्यावरील गोष्टींवर आपलं काहीच नियंत्रण नाही. अनेकजण आपली आवड, नावड त्यावर स्पष्टपणे व्यक्त करतात. ज्यांना एखादी गोष्ट नाही आवडली, त्यांना ते स्पष्टपणे बोलण्याचा अधिकार नक्कीच आहे आणि मी प्रत्येकाचा मताचा आदर करते. पण मी ज्याप्रकारचे कपडे परिधान करते, ते एकप्रकारे माझं मतंच आहे की मला हेच करायचंय आणि मी अशीच आहे. माझ्या मताचाही लोकांनी आदर करावा", अशा सडेतोड शब्दांत तिने ट्रोलर्सना सुनावलं. त्याचसोबत ट्रोलिंगचे कमेंट्स वाचत नसल्याचंही तिने सांगितलं. मला जे करायचं आहे ते मी करते, पण ते तुम्हाला आवडलंच पाहिजे असं नाही. तुमची आवड किंवा नावड हा पूर्णपणे तुमचा वैयक्तिक मत आहे, असं ती पुढे म्हणाली.नुसरतने फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात 'हाय स्लीट गाऊन' परिधान केला होता. या गाऊनचा कट फार वरपर्यंत असल्याने त्यावरून नेटकऱ्यांनी नुसरतला ट्रोल केलं. 'आज कालचे फॅशन डिझायनर कुठे कात्री लावतील सांगता येत नाही,' असं एकाने लिहिलं तर दुसऱ्या एक फॉलोअरने, 'अरे आपल्या देशात किती गरिबी आली आहे,' अशी कमेंट केली होती. नुकत्याच पार पडलेल्या फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात अभिनेत्री नुसरत भरुचाने परिधान केलेला गाऊन सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला. काहींनी तिच्या या बोल्ड लूकची स्तुती केली तर अनेकांनी कपड्यांच्या स्टाइलवरून टीका केली. ट्रोलिंगला न जुमानता मला जसं वागायचं आहे तसंच मी वागेन असं बेधडक उत्तर नुसरत टीकाकारांना दिलं आहे.



# ॲनिमलतील डिलीट केलेले सीन व्हायरल!



रणबीर कपूरच्या 'ॲनिमल' या चित्रपटाची आजही वेगवेगळ्या कारणांनी चर्चा होताना दिसते. डिसेंबर २०२३ मध्ये प्रदर्शित झालेल्या ॲनिमल या चित्रपटाने मोठा गल्ला जमवीत बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला होता. आता या चित्रपटातून डिलीट केलेल्या सीनमुळे 'ॲनिमल' हा चित्रपट पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.'ॲनिमल' चित्रपटातील काढून टाकलेले सीन सध्या सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसत आहेत. महत्त्वाचे म्हणजे नेटकरी हे सीन बघितल्यानंतर आश्चर्य व्यक्त करताना दिसत आहेत. हे सीन चित्रपटात का घेतले नाहीत, असा प्रश्न ते विचारताना दिसत आहेत.समोर आलेला सीन हा विमानातील आहे. विमानात रणबीर कपूर आणि त्याचे साथीदार बसलेले दिसत आहेत. रणबीर कपूर अत्यंत मद्यधुंद अवस्थेत असून, पायलटकडे जातो आणि पायलटच्या खांद्यावर हात ठेवून त्याला उठण्याचा इशारा देतो. त्याचे सर्व साथीदार तो काय करीत आहे, याकडे आश्चर्याने पाहत आहेत. पायलटला उठवून रणबीर त्याच्या जागी स्वत: विमान चालवतो. यावेळी रणबीरच्या तोंडात सिगारेट असून तो विमान चालवीत असल्याचे ते दृश्य आहे. या सीनच्या पार्श्वभूमीला पापा मेरी जान हे गाणे चालू असल्याचे दिसत आहे.आता हे दृश्य पाहिल्यानंतर एका नेटकऱ्याने संदीप रेड्डी वंगा यांना टॅग करीत म्हटले आहे की, चित्रपटातून हे सीन डिलीट केल्याबद्दल मी तुम्हाला माफ करणार नाही. रणबीरने त्याच्या भावाला मारल्यानंतर त्याची शांतता आणि वेदना यातून स्पष्ट दिसत आहे. एका युजरने, "विमान उडतानाचे हे दृश्य चित्रपटाच्या कहाणीला वेगळ्या उंचीवर घेऊन जात आहे", असे म्हटले आहे. एका युजरने म्हटले आहे की, स्वत: संदीप रेड्डी वंगा यांनी स्वत:च हा सीन चित्रपटात न घेतल्याबद्दल खेद व्यक्त केला आहे. एका मुलाखतीदरम्यान त्यांनी सांगितले होते की, त्यांना चित्रपटाचा वेळ ३.३० तास ठेवायचा होता. मात्र, नेटफ्लिक्सच्या पॉलिसीमुळे त्यांनी तो सीन कट केला.दरम्यान, संदीप रेड्डी वंगा दिग्दर्शित 'ॲनिमल' चित्रपटाची आजही चाहते आणि चित्रपटसृष्टीत मोठी चर्चा होताना दिसते. अनेकांनी या चित्रपटात दाखविलेल्या काही दृश्यांवर टीकादेखील केल्याचे पाहायला मिळाले होते.

# अपील करायला लाज वाटली पाहिजे

## महाराष्ट्रासाठी धावून आला ऋतुराज गायकवाड

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**सध्या रणजी ट्रॉफीचे सामने खेळवले जात आहेत आणि प्रत्येक सामने मोठे रंजक होत आहेत. महाराष्ट्र वि रेल्वे सर्विसेस यांच्यात सामना खेळवला जात आहे. महाराष्ट्र क्रिकेट संघाचा खेळाडू ऋतुराज गायकवाड मात्र सध्या ऑस्ट्रेलियात आहे. यादरम्यानच भारतीय अ संघ ऑस्ट्रेलिया अ संघाविरूद्ध ऑस्ट्रेलियात सामने खेळत आहे, या संघाचा ऋतुराज गायकवाड कर्णधार आहे. पण ऑस्ट्रेलियात असूनही ऋतुराजची नजर महाराष्ट्रात होणाऱ्या रणजी सामन्यावर आहे. याबाबत त्याने एक इन्स्टाग्राम स्टोरी शेअर केली आहे.**






रणजी ट्रॉफीत महाराष्ट्र आणि सर्विसेसमध्ये सामना सुरू आहे. पहिल्या डावात सर्विसेसन २९३ धावा केल्या. तर दुसऱ्या डावात महाराष्ट्राचा संघ १८५ धावांवर सर्वबाद झाला आहे. यादरम्यानच्या एका कॅचचा व्हीडिओ ऋतुराजने आपल्या इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. या व्हीडिओच्या कॅप्शनमध्ये ऋतुराज म्हणाला, या कॅचवर फलंदाजाला बाद कसं काय दिलं गेलं, तेही लाईव्ह सामन्यात? झेल टिपल्याचे अपील करायला पण लाज वाटली पाहिजे. हे किव येण्यासारखं आहे. आणि खाली रणजी आणि महाराष्ट्र वि सर्विसेस सामन्याचे हॅशटॅग त्याने दिले आहेत.ऋतुराजने शेअर केलेल्या या व्हिडीओमध्ये फलंदाजाच्या बॅटची कड घेत चेंडू स्लिपमध्ये गेला. स्लिपमध्ये क्षेत्ररक्षक तैनात होता. महाराष्ट्र संघाचा अंकित बावणे फलंदाजी करत होता. अंकितच्या बॅटची कड घेतलेला चेंडू स्लिपमध्ये गेला, पण त्याच्याकडे पोहोचण्यापूर्वी तो चेंडू त्याच्यासमोर टप्पा पडल्याचे स्पष्ट दिसत आहे. पण तरीही महाराष्ट्राच्या फलंदाजाला झेलबाद घोषित केले गेले. याचा व्हीडिओ सोशल मीडियावर शेअर करत ऋतुराज गायकवाडने ताशेरे ओढले आहेत आणि खूपच तिखट शब्दात या विकेटचा त्याने निषेध नोंदवला आहे.ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्त्वाखालील भारतीय अ संघ ऑस्ट्रेलिया अ विरूद्ध दुसरा अनऑफिशियल सामना खेळत आहे. भारतीय अ संघ पहिल्या डावात १६१ धावा करत बाद झाला. तर कर्णधार असलेल्या ऋतुराज गायकवाडला अद्याप या सामन्यांमध्ये आपल्या उत्कृष्ट खेळीने छाप पाडता आलेली नाही. दुसऱ्या अनऑफिशियल सामन्यातही ऋतुराज ४ धावा करत बाद झाला. पण ध्रुव जुरेलने ८० धावांची खेळी करत संघाची धावसंख्या १५० पार नेली.ऋतुराजने शेअर केलेल्या या व्हिडीओमध्ये फलंदाजाच्या बॅटची कड घेत चेंडू स्लिपमध्ये गेला. स्लिपमध्ये क्षेत्ररक्षक तैनात होता. महाराष्ट्र संघाचा अंकित बावणे फलंदाजी करत होता. अंकितच्या बॅटची कड घेतलेला चेंडू स्लिपमध्ये गेला, पण त्याच्याकडे पोहोचण्यापूर्वी तो चेंडू त्याच्यासमोर टप्पा पडल्याचे स्पष्ट दिसत आहे. पण तरीही महाराष्ट्राच्या फलंदाजाला झेलबाद घोषित केले गेले. याचा व्हीडिओ सोशल मीडियावर शेअर करत ऋतुराज गायकवाडने ताशेरे ओढले आहेत आणि खूपच तिखट शब्दात या विकेटचा त्याने निषेध नोंदवला आहे.ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्त्वाखालील भारतीय अ संघ ऑस्ट्रेलिया अ विरूद्ध दुसरा अनऑफिशियल सामना खेळत आहे. भारतीय अ संघ पहिल्या डावात १६१ धावा करत बाद झाला. तर कर्णधार असलेल्या ऋतुराज गायकवाडला अद्याप या सामन्यांमध्ये आपल्या उत्कृष्ट खेळीने छाप पाडता आलेली नाही. दुसऱ्या अनऑफिशियल सामन्यातही ऋतुराज ४ धावा करत बाद झाला. ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्त्वाखालील भारतीय अ संघ ऑस्ट्रेलिया अ विरूद्ध दुसरा अनऑफिशियल सामना खेळत आहे. भारतीय अ संघ पहिल्या डावात १६१ धावा करत बाद झाला. तर कर्णधार असलेल्या ऋतुराज गायकवाडला अद्याप या सामन्यांमध्ये आपल्या उत्कृष्ट खेळीने छाप पाडता आलेली नाही. दुसऱ्या अनऑफिशियल सामन्यातही ऋतुराज ४ धावा करत बाद झाला. पण ध्रुव जुरेलने ८० धावांची खेळी करत संघाची धावसंख्या १५० पार नेली.ऋतुराजने शेअर केलेल्या या व्हिडीओमध्ये फलंदाजाच्या बॅटची कड घेत चेंडू स्लिपमध्ये गेला.

### महाराष्ट्राच्या फलंदाजाला बाद घोषित केले

ऋतुराजने शेअर केलेल्या या व्हिडीओमध्ये फलंदाजाच्या बॅटची कड घेत चेंडू स्लिपमध्ये गेला. स्लिपमध्ये क्षेत्ररक्षक तैनात होता. महाराष्ट्र संघाचा अंकित बावणे फलंदाजी करत होता. अंकितच्या बॅटची कड घेतलेला चेंडू स्लिपमध्ये गेला, पण त्याच्याकडे पोहोचण्यापूर्वी तो चेंडू त्याच्यासमोर टप्पा पडल्याचे स्पष्ट दिसत आहे. पण तरीही महाराष्ट्राच्या फलंदाजाला झेलबाद घोषित केले गेले. याचा व्हीडिओ सोशल मीडियावर शेअर करत ऋतुराज गायकवाडने ताशेरे ओढले आहेत आणि खूपच तिखट शब्दात या विकेटचा त्याने निषेध नोंदवला आहे.

# रोहितला त्याच्या मुलाच्या जन्मासाठी थांबायचे असेल


## हिटमॅनबद्दलच्या वक्तव्यावर फिंचने गावस्करांना दिले चोख प्रत्युत्तर

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय संघ बॉर्डर गावसकर ट्रॉफीसाठी ऑस्ट्रेलियाला जाणार आहे. येत्या २२ नोव्हेंबरपासून भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील ही पाच कसोटी सामन्यांची मालिका सुरू होणार आहे. तत्पूर्वी भारताला घरच्या मैदानावर न्यूझीलंडविरूद्ध मोठा पराभव पत्करावा लागला आहे.**








या मोठ्या पराभवानंतर ऑस्ट्रेलिया दौऱ्यावरील पहिल्या किंवा दुसऱ्या कसोटीला भारताचा कर्णधार रोहित शर्मा मुकणार असल्याचे म्हटले जात आहे. यानंतर भारताचे दिग्गज खेळाडू सुनील गावसकर यांनी रोहितला संपूर्ण मालिकेत कर्णधारपदावरून हटवले जावे आणि बुमराहला त्याच्या जागी नेतृत्वाची जबाबदारी द्यावी आणि रोहितने खेळाडू म्हणून खेळावे असे ते म्हणाले होते.

पण यावर आता कांगारू संघाचा माजी कर्णधार आरोन फिंचने त्यांच्या या वक्तव्यावर उत्तर दिले आहे.ऑस्ट्रेलियाचा माजी क्रिकेटपटू आरोन फिंचने सुनील गावस्कर यांना चांगलेच प्रत्युत्तर दिले आहे. गावस्कर म्हणाले होते की, बीसीसीआयच्या निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनी रोहितला आधीच कळवायला हवे की भारत आपल्या कर्णधाराशिवाय पहिली कसोटी खेळू शकणार नाही. अशा स्थितीत गरज भासल्यास बुमराहला पाचही सामन्यांसाठी संघाचा कर्णधार बनवायला हवा. पण फिंचला गावस्करचे म्हणणे अजिबात पटले नाही.अराउंड द विकेट पॉडकास्टमध्ये बोलत असताना आरोन फिंच म्हणाला की,"मी सुनील गावस्कर यांच्याशी अजिबात सहमत नाही. जर त्याला मुलाच्या जन्मावेळी घरच्यांबरोबर राहायचं असेल तर त्याच्यासाठी तो अमूल्य क्षण असेल.

### रोहित शर्मा दुसऱ्यांदा बाबा होणार

भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिली कसोटी खेळणार नसल्याचे गेल्या अनेक दिवसांपासून अहवालांमध्ये समोर येत आहे. यामागचं कारण म्हणजे रोहित शर्मा दुसऱ्यांदा बाबा होणार असल्याची चर्चा आहे. यामुळेच रोहित शर्मा पहिली कसोटी खेळणार नाहीय. रोहित शर्मा वैयक्तिक कारणांमुळे पहिली कसोटी खेळणार नसल्याचे त्याने पूर्वीच बीसीसीआयला सांगितलं आहे, असे बीसीसीआयच्या सूत्रांनी सांगितले होते.